# मेट्रो मार्ग ३ प्रवासादरम्यान मिळणार अखंडित मोबाइल सेवा

मुंबई (प्रतिनिधी) : मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनने (मुं.मे.रे.कॉ.) सौदी अरेबियामधील रियाध शहरात स्थित असलेल्या एसीईएस या कंपनीच्या इंडिया प्रायव्हेट लिमिटेड या उपकंपनीसोबत मेट्रो मार्ग-३ करता दूरसंचार पायाभूत सुविधा प्रदान करण्याच्या करारावर स्वाक्षरी केली. सोमवारी सौदी अरेबियातील रियाध शहरात आयोजित एका कार्यक्रमामध्ये करारावर स्वाक्षरी करण्यात आली. यावेळी मुं.मे.रे.कॉ. च्या व्यवस्थापकीय संचालक अश्विनी भिडे, संचालक (नियोजन आणि रिअल इस्टेट डेव्हलपमेंट/ NFBR) १ आर. रमणा, संप्रेषण आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालय विभागातील दूरसंचार आणि पायाभूत सुविधांचे उपमंत्री (MCIT)(इंजि.) बस्सम ए. अल-बस्सम, एसीईएसचे मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ) डॉ. अक्रम अबुरस, मुख्य तंत्रज्ञान अधिकारी (सीटीओ) डॉ. खालिद अलमाशोक, एसीईएस इंडिया प्रायव्हेट लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक मोहम्मद मजहर तसेच अमित शर्मा उपस्थित होते.

मुंबई विभाग